क्रमांक : ८३७६/ क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : ४ जून, २०२०

**संदर्भ :- शासन निर्णय क्र.:वशिअ-११२०/प्र.क्र.२७/११, दिनांक ११ मे, २०२०.**

**:: परिपत्रक ::**

कोरोना विषाणूच्या संसर्गास प्रतिबंध करण्याच्या उपाययोजना करणे, नागरिकांना जीवनावश्यक वस्तुंची उपलब्धता सुनिच्छित करणे अशा वेगवेगळ्या कामांमध्ये प्रशासनिक यंत्रणा व्यस्त आहे. या विषाणूचा प्रसार शासकीय कार्यालयांमध्ये होऊ नये आणि अधिकारी / कर्मचारी यांना त्याचा संसर्ग होऊ नये यासाठी कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन उपस्थितीवरही मर्यादा घालण्यात आल्या आहेत. त्यामुळे वरील आदेशान्वये विहित केलेल्या कालमर्यादेत मत्ता व दायित्वाची विविरणे सादर करणे शक्य होणार नाही.

ही परिस्थिती विचारात घेऊन, दर वर्षाची मत्ता व दायित्वाची नियतकालिक विवरणे सादर करण्यासाठी विहित केलेली दिनांक ३१ मे पर्यंतची कालमर्यादा या वर्षापुरती एक विशेष बाब म्हणून शिथिल करण्यात येत असून राज्य शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांनी मार्च, २०२० च्या स्थितीस अनुसरून त्यांचे मत्ता व दायित्वाचे विवरण विहित प्राधिकरणास दिनांक ३१ऑगस्ट, २०२० पर्यंत सादर करावे.

तसेच , सेवेत प्रथम नियुक्त झालेले अधिकारी / कर्मचारी, त्यांचा सेवेचा पहिल्या दोन महिन्यांच्या कालावधी हा राज्यातील लॉकडाऊन सुरू झाल्यानंतर पूर्ण होत असल्यास त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या वेळेच्या स्थितीस अनुसरून मत्ता व दायित्वाचे पहिले विवरण विहित कालावधीत सादर करु शकले नाहीत वा शकत नाहीत अशी प्रकरणे असल्यास, अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांनाही त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या वेळेच्या स्थितीस अनुसरून द्यावयाचे मत्ता व दायित्वाचे विवरण दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत सादर करण्याची मुभा असेल अशी तरतूद सदरहू शासन निर्णयात करण्यात आली आहे.

**उपरोक्त नमूद शासन निर्णयातील तरतुदीच्या अनुषंगाने या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी (चतुर्थश्रेणी कर्मचारी वगळून) यांनी दिनांक ३१ मार्च, २०२० च्या स्थितीस अनुसरुन मत्ता व दायित्वाचे विवरणपत्र विहित प्रपत्रात दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० पर्यंत आस्थापना कक्षास सादर करावे.**

आदेशानुसार,

**( ऋतुराज ज. कुडतरकर)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति :-

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय.
२) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय.
३) मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषद व महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी (चतुर्थश्रेणी कर्मचारी वगळून)
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सुरक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी.
६) निवडनस्ती
७) संगणक कक्ष